म वि नि आ

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी क्र. :** (०२२) २२१६ ३९६४ / ६५ / ६९, **फॅक्स क्र. :** (०२२) २२१६ ३९७६
**ई-मेल : mercindia@merc.gov.in संकेतस्थळ : www.merc.gov.in / www.mercindia.org.in**

**जाहिरात क्र. : १३/२०१५-१६**

# जाहीर नोटीस

## प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वायूवर आधारित विद्युत निर्मिती क्षमतेच्या वापरासाठीच्या योजनेचे कार्यान्वयन) विनियम, २०१५ वर अभिप्राय मागविण्याबाबत

भारत सरकारच्या विद्युत मंत्रालयाने ओ. एम. क्र. ४/२/२०१५-टीएच. १ अन्वये दिनांक २७.०३.२०१५ रोजी वायूवर आधारित विद्युत निर्मिती क्षमतेच्या वापरासाठी योजना मंजूर केली आहे. या योजनेमध्ये इंधनाअभावी बंद असलेले वायूवर आधारित प्रकल्प तसेच देशांतर्गत वायूचा वापर करणाऱ्या प्रकल्पांनी आयात केलेला स्पॉट आरएलएनजी (ई-बीड आरएलएनजी)चा पुरवठा करण्याचे अभिप्रेत आहे. सदर योजनेत, ज्या प्रकल्पांचा प्रत्यक्ष सरासरी संयंत्र भार घटक (पीएलएफ) एप्रिल २०१४ ते जानेवारी २०१५ या कालावधीत लक्ष्यांकित पीएलएफपेक्षा कमी होता असे, इंधनाअभावी बंद असलेले वायूवर आधारित प्रकल्प आणि देशांतर्गत वायूचा वापर करणारे प्रकल्प समाविष्ट आहेत. या योजनेमध्ये पारेषण आकार व हानी माफ करणे आणि विद्युत यंत्रणा विकास निधीमधून मदत देणे अपेक्षित आहे.

सदर योजनेचे कार्यान्वयन सुकर व्हावे म्हणून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वायूवर आधारित विद्युत निर्मिती क्षमतेच्या वापरासाठीच्या योजनेचे कार्यान्वयन) विनियम, २०१५ तयार केले आहेत. सदर प्रारुप विनियम, वायूवर आधारित विद्युत निर्मिती क्षमतेच्या वापरासाठीच्या योजनेसह आयोगाच्या www.mercindia.org.in / www.merc.gov.in या संकेतस्थळांवर उतरवून घेण्याच्या नमुन्यात उपलब्ध आहेत.

या प्रारुप विनियमांवर आयोग, लेखी अभिप्राय, सूचना आणि / किंवा हरकती मागवित असून त्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे सचिव, यांना १३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५ या पत्त्यावर, व्यक्तिश: किंवा टपालाने किंवा फॅक्स किंवा ई-मेल (फॅक्स क्र. (०२२) २२१६ ३९७६, ई-मेल : **mercindia@merc.gov.in**) द्वारा पाठविण्यात याव्यात. दि. ११ डिसेंबर, २०१५ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती आयोगाकडून प्रारुप विनियम अंतिम मसुदा करण्याआधी विचारात घेण्यात येतील.

दिनांक : २१.११.२०१५ स्वाक्षरी/-

ठिकाण : मुंबई सचिव, **मविनिआ**